पोलीस स्टेशन सिटी चौक औरंगाबाद (stamp)

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT
## (Under Section 154 Cr.P.C.)
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** औरंगाबाद शहर **P.S.(ठाणे):** शहर चौक

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0235 **Year (वर्ष):** 2023

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 15/07/2023 06:07

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भारतीय दंड संहिता १८६० | ५०४ |
| 3 | भारतीय दंड संहिता १८६० | ५०६ |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** शुक्रवार
   **Time Period (कालावधी):** पहर 7
   **Date From (दिनांक पासून):** 14/07/2023
   **Date To ( दिनांक पर्यंत):** 14/07/2023
   **Time From (वेळेपासून):** 21:21 बजे
   **Time To (वेळेपर्यंत):** 21:21 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 15/07/2023 **Time (वेळ):** 05:27 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 019
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 15/07/2023 05:27 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पूर्व, 1 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** शहागंज मधील गांधीभवनजवळ,रोडच्या कडेला फळाच्या गाड्याजव,औरंगाबाद

(c) **In case, outside the limit of this Police Station, then**
(या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): शेख रफीक शेख युसूफ शेख

(b) **Father's Name** (वडील चे नाव) : शेख युसूफ

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1984

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.** (पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card, Voter ID Card, Passport, UID No., Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | समतानगर,औरंगाबाद,क्रांति चौक,औरंगाबाद शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | समतानगर,औरंगाबाद,क्रांति चौक,औरंगाबाद शहर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय): व्यवस्थापक

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-8007094786

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | अशफाक मुस्ताक शेख | | वडील का नाम : मुस्ताक शेख | 1. पोलीस ठाणे जिन्सी,पोलीस उप निरीक्षक,औरंगाबाद शहर, जिन्सी,औरंगाबाद शहर,महाराष्ट्र, भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

फिर्याद दि. 15/07/2023..

मी शेख रफीक शेख युसूफ, वय 39 वर्ष, व्यवसाय- मॅनेजर( ए.एफ. नौरंगी मेट्रो बिल्डर ऍन्ड डेव्हलपर्स) रा. समतानगर, औरंगाबाद मो.नं.8007094786.

मी दिनांक 18/05/2023 रोजीसमक्ष ऍन्टीकरप्शन कार्यालय औरंगाबाद येथे ए.एफ. नौरंगी मेट्रो बिल्डर्स ऍन्ड डेव्हलपर्सचे माझे मालक अलिमोददीन खान यांचेसह हजर येऊन तक्रार दिली होती की, मी वरील प्रमाणे असुन, ए. एफ.नौरंगी मेट्रो बिल्डर ऍन्ड डेव्हलपर्स या विकास संस्थेमध्ये मालक श्री. अलिमोददीन खान जलालोददीन खान यांच्या कन्सट्रक्शन लाईनमध्ये मॅनेजर म्हणुन काम करतो.

मालक श्री. अलिमोददीन खान यांच्या विरुध्द जिन्सी पो.स्टे. औरंगाबाद येथे दिनांक 20/02/2023 रोजी एफआयआर क्र. 51/2023 कलम-420 व इतर कलमा प्रमाणे गुन्हा दाखल आहे. त्या गुन्हयात मालक श्री. अलिमोददीन यांना जिन्सी पोलीसांनी अटक केली होती. सदरचा गुन्हा हा जमीनीच्या मॅटरवरुन असल्याने पोलीस निरीक्षक अशोक भंडारी साहेब व पीएसआय अशफाक शेख यांनी मिळुन मालक अलीमोददीन यांना धमकी देऊन, मालक अलीमोददीन यांचेविरुध्द गुन्हा दाखल करण्याचे अगोदर मालक अलिमोददीन यांचेकडुन व पीसीआर मध्ये असताना त्यांचा भाऊ सहेर खॉन व मुलगा अमान खान यांचे कडुन कमीत कमी 10 लाख रुपये यापुर्वीच घेतलेले आहेत. त्याबाबत मालक अलीमोददीन खान यांनी त्यांचा लेखी तक्रारी अर्ज मी दि.18/05/2023 रोजी मी ऍन्टी करप्शनला दिलेल्यां तक्रारी सोबत दिलेली आहे.

त्या गुन्हयात माझा देखील जबाब पीएसआय अशफाक शेख यांनी घेतला आहे. तो जबाब घेण्यापुर्वी मला देखील मालक अलीमोददीन यांचे सारखे आरोपी करणार आहे अशी भिती त्या गुन्हयाचे तपासी अधिकारी पी.एस.आय. अशफाक शेख साहेब व पो.स्टे.जिन्सीचे पोलीस निरीक्षक श्री. अशोक भंडारी साहेब यांनी घातली होती. त्यावेळी अशोक भंडारी साहेब यांनी मला वरील गुन्हयात आरोपी न करता साक्षीदार करतो असे म्हणुन माझ्याकडुन एक लाख रुपये घेतलेले आहेत.

त्यानंतर त्या गुन्हयाचे तपासीक अधिकारी अशफाक शेख यांनी मला जिन्सी पोलीस स्टेशन येथे बोलावुन अशी धमकी दिली की, मी वरील गुन्हयाचा तपासीक अधिकारी आहे. आय.ओ. ला आयुक्त साहेब व पी.आय. यांच्या पेक्षा जास्त पावर असतांत तुम्ही भंडारी साहेबांना भेटलात व एक लाख रुपये दिले पण तुम्ही मला भेटला नाहीत. असे म्हणुन माझ्या 36 सहया घेऊन 36 अंगठे कागदावर घेतले आहेत. तसेच तुम्हाला आरोपी करायचे नसेल तर 50 हजार रुपये मला दयावे लागतील असे सांगितले.

तसेच मालक अलिमोददीन यांचे कन्ट्रक्शन मध्ये मी मॅनेजर असल्याने आमच्या कन्ट्रक्शन मधील मिस्तरी शेख निसार शेख कौसर याला वरील गुन्हयात जबाब देण्याकामी पोलीस स्टेशनला हजर करा आणि त्याला सुध्दा आरोपी करायचे नसेल तर त्याचेहीं 50 हजार रुपये दयावे लागतील असे म्हणुन पैसे न दिल्यास मला व आमच्या कन्ट्रक्शन मधील मिस्तरी शेख निसार शेख कौसर याला जेलमध्ये टाकण्याची व मुख्य आरोपी करण्याची धमकी पीएसआय अशफाक शेख साहेबांनी मला दिली आहे. दिनांक 18/05/2023 रोजी पीएसआय अशफाक शेख यांची नाईट डयुटी असल्याचे त्यांनी मला कळवुन रात्री 11.00 वाजता पो.स्टे.जिन्सी येथे बोलविले.होते.

त्याप्रमाणे मी ऍन्टी करप्शन ब्युरो औरंगाबाद येथील क्षीरसागर साहेबांकडे दोन पंचासमक्ष माझ्या हस्ताक्षरात लेखी तक्रार दि.18/05/2023 रोजी दिल्यानंतर क्षीरसागर साहेबांनी दोन पंच, सापळा पथकासह मला सुचना देऊन पो. ठाणे जिन्सी जवळील एका सुरक्षित जागी बोलविले. त्याप्रमाणे आम्ही हजर झालो. त्या ठिकाणी आम्हा सर्वांना लाचमागणी पडताळणीच्या अनुषंगाने सुचना देऊन पंच क्र.1 यांना माझ्या सोबत देऊन, व्हाईस रेकॉर्डर मध्ये नवीन मेमरीकार्ड टाकुन व्हाईस रेकॉर्डर चालु करुन देऊन, पीएसआय अशफाक शेख यांना भेटण्यासाठी पो.स्टे. जिन्सी येथे दि.19/05/2023 रोजी 00.24 वा. पाठविले.

त्याप्रमाणे मी पंच क्र.1: यांना सोबत घेऊन पो.ठाणे जिन्सी येथे पीएसआय अशफाक शेख यांना भेटलो त्यावेळी

त्यांनी मला साक्षीदार निसार याला हजर करा असे सांगुन निसार याला पो.ठाणे जिन्सीच्या वरील गुन्हयात आरोपी न करता साक्षीदार करायचे असेल तर त्यासाठी 50 हजार रुपये मागितले त्यावेळी मी त्यांना त्यात कमी करण्याची विनंती केली असता त्यांनी तीस हजार फायनल दया असे बोलुन तीस हजार रुपयाची फायनल लाचमागणी केली. तसेच त्यावेळी आमचे मालक ए.एफ.नौरंगी मेट्रो बिल्डर ऍन्ड डेव्हलपर्स अलिमोददीन ज्यांना पीएसआय अशफाक शेख यांनी अटक केली होती. त्यावेळी त्यांच्याकडुन पीएसआय अशफाक शेख यांनी अलीमोददीन यांचेकडुन घेतलेल्या पैशाबाबतही बोलणे झाले होते. लाचमागणी पडताळणीच्या वेळी पीएसआय अशफाक शेख यांनी निसार याचे तीस हजार रुपये मागणी केल्यानंतर मी परत निघते वेळी मी माझ्या अंगावर कांही वस्तूमध्ये रेकॉर्डींग करीत तर नाही ना अशी शंका पीएसआय अशफाक शेख साहेब यांनी घेतली होती. त्यावेळी मी पीएसआय अशफाक शेख यांना शर्ट काढुन दाखवू का असे म्हणुन समजुत काढली होती. त्यावेळी पीएसआय अशफाक शेख यांनी माझे मालक अलीमोददीन खान यांचे विषयी विचारपुस करुन, अलीम भाई काकुछ चल रहा है क्या असे म्हणुन अलीमोददीन खान यांचेवर संशय व्यक्त केला होता. त्यावेळी मी पीएसआय अशफाक शेख यांची तसं कांही नाही असे म्हणुन समजुत काढली होती.

दि.19/05/2023 च्या लाच मागणी पडताळणी नंतर मी हज कमीटीच्या कामानिमीत्त मुंबईला कांही दिवस गेलो होतो. त्यामुळे पीएसआय अशफाक शेख यांची भेट घेतली नव्हती.त्यानंतर कांही दिवसाने पीएसआय अशफाक शेख यांनी मला फोन वरुन धमकी देऊन बोलविल्याने मी दिनांक 01/06/2023 रोजी निसार शेख याला सोबत घेऊन पीएसआय अशफाक शेख यांची पोलीस स्टेशन जिन्सी येथे भेट घेतली. त्यावेळीही पीएसआय अशफाक शेख यानी बोलले की, मी सांगेल तेंव्हा निसारचे 30 हजार रुपये दयायचे असे सांगितले. त्याबाबत मी दिनांक 02/06/2023 रोजी वरील घटनेबाबत पुरवणी जबाब क्षीरसागर साहेबांकडे दिलेला आहे.

त्यानंतर 04/07/2023 रोजी पीएसआय अशफाक शेख यांनी मला व्हॉटसअप कॉल केला होता तो कॉल मी उचलला नव्हता. त्यानंतर दि.08/07/2023 रोजी रात्री 08.42 वाजता पीएसआय अशफाक शेख यांनी मला फोन करुन माझे मालक अलीमोददीन खान यांचे वडीलांचे सहीचा जुना एक अर्ज व दोन फोटो घेऊन येण्याचे सांगितले होते. त्यामुळें मी थोडया वेळाने 10.11 वाजता पीएसआय अशफाक शेख यांना फोन करुन येण्याचे विचारले असता त्यांनी पोलीस स्टेशन जिन्सी येथे येण्याचे सांगितले. त्याप्रमाणे मी मालक अलीमोददीन खान यांचे वडीलांचे सहीचा जुना एक अर्ज व दोन फोटो घेऊन माझा मित्र शेख असद याला घेऊन पोलीस स्टेशन जिन्सी येथे पीएसआय अशफाक शेख यांना नेऊन दिले.

त्यावेळी पीएसआय अशफाक शेख यांनी मला धमकी देऊन बोलले की, अलीमोददीन यांचेवरील दाखल गुन्हयात अकबर यांचा जबाब घेणे आहे त्याकरीता अकबर यांना हजर करण्याची जिम्मेदारी तुम्हाला देत आहे. त्या अकबरला माझ्या समोर हजर करा असे ठणकावुन सांगितले. निसार शेख याचे 30 हजार बरेच दिवस झाले तुमच्याकडं हाईत ते 30 हजार रुपये व अलीमोददीन खान यांचे 3 लाख रुपये ठरले होते. त्यातले यापुर्वी 1 लाख 90 हजार रुपये मला मिळाले असुन त्यातील 1 लाख 10 हजार रुपये अलीमोददीन खान यांचेकडे बाकी आहेत. ते 1 लाख 10 हजार रुपये व निसार याचे 30 हजार रुपये असे 1 लाख 40 हजार रुपये घेऊन बुधवारी पडेगांव येथील पठाण धाब्यावर यायचे, आणि अलीमोददीन खान यांचे ठरलेले पैशातील राहिलेले 1 लाख 10 हजार रुपये त्यांची दयायची नियत दिसत नाही. रफीकभाई मेरा तुम्हारे पे भरोसा है..लेकीन वो अलीमोददीन पे मेरा भरोसा नही है. पैसे देणेवाला आदमी बार बार पुछता नही. डायरेक लाके दे देता..तुम भी इसके बाद मेरको बार बार पैसेका आकडा पुछने का नही और साथ में दुसरा आमदी लाने का नही अकेलेने आनेका..और पुरे 1 लाख 40 हजार लाये तों आनेका नही तो मत आव..और ये व्यवहार खतम कर दो असे बोलुन बुधवार दिनांक 12/07/2023 रोजी पीएसआय अशफाक शेख यांची साप्ताहीक असल्याचे सांगुन वरील प्रमाणे 1 लाख 40 हजार रुपये घेऊन येण्याचे सांगितले आहे. निसार शेख याचे 30 हजार रुपये व अलीमोददीन खान यांचे 1 लाख 10 हजार रुपये असे मिळुन 1 लाख 40 हजार रुपया प्रमाणे पुढील कारवाई करावी अशी विनंती करुन वरील घटना ही मी क्षीरसागर साहेबांकडे जाऊन दिनांक 11/07/2023 रोजी सांगुन तसा पुरवणी जबाब दिलेला आहे.

त्यानंतर दिनांक 12/07/2023 रोजी मला पीएसआय अशफाक शेख हे पठाण धाब्याचे ऐवजी पोलीस स्टेशन जिन्सी येथे कामानिमीत्त आल्याचे माहीत झाले. त्यामुळे मी व माझे मालक अलीमोददीन असे ऍन्टी करप्शन ऑफीस औरंगाबाद येथे गेलो. क्षीरसागर साहेबांना पीएसआय अशफाक शेख हे पोलीस स्टेशनला असल्याचे कळवुन पोलीस स्टेशन जिन्सी येथे पीएसआय अशफाक शेख यांना भेटायला जाणार असल्याचे कळवुन पोलीस स्टेशनला पीएसआय अशफाक शेख यांचे विरुध्द पुढील सापळा कारवाई करावी अशी विनंती केली.

त्यानंतर क्षीरसागर साहेबांनी लाचेच्या रकमेबाबत विचारणा केली त्यावेळी मी शेख निसार याचे 30,000/- रुपये व माझे मालक अलीमोददीन खान यांची पीएसआय अशफाक शेख यांना दयावयाची बाकी राहिलेली रक्कम 1 लाख

10 रुपयांपैकी केवळ 70 हजार रुपये अलीमोददीन यांनी माझ्याकडे दिल्याप्रमाणे 70,000/- रुपये असे मिळुन एकुण 1 लाख रुपये क्षीरसागर साहेब यांचेकडे हजर केले त्या नोटांचे नंबर एका कागदावर लिहुन घेतल्यानंतर सापळा कारवाईत ऍन्थ्रॉसीन पावडर व अल्ट्रा व्हायलेट लॅम्प यांचे गुणधर्माविषयी माहीती देऊन प्रात्यक्षीक दाखविले. व त्यानंतर ऍन्थ्रॉसीन पावडर मी हजर केलेल्या त्या नोटांना लावली. त्यानंतर त्या नोटांचे 30 हजाराचे एक बंडल व 70 हजार रुपयाचे दुसरे बंडल असे दोन बंडल मी परिधान केलेल्या शर्टाचे शर्टींग केलेल्या पॅन्टचेवरील बाजुस पोटाचे वर डावे बाजुस पंचासमक्ष अलगत ठेवल्या. त्यानंतर मी, माझे मालक अलीमोददीन खान, क्षीरसागर साहेब, दोन्ही पंच, सापळा पथकातील सदस्य असे आम्ही पोलीस ठाणे जिन्सी जवळ गोपनिय ठिकाणी गेलो. त्या ठिकाणी क्षीरसागर साहेबांनी आम्हा सर्वांना सापळा कारवाईच्या संबंधाने सुचना व मार्गदर्शन केले.
त्यानंतर व्हाईस रेकॉर्डरमध्ये नवीन मेमरीकार्ड टाकुन व्हाईस रेकॉर्डर चालु करुन पंच क्र.1 यांना सोबत दिले. त्यानंतर मी व पंच क्र.1 असे पंच क्र.1 यांच्या खाजगी मोटार सायकलने पोलीस स्टेशन जिन्सी येथे जाऊन पीएसआय अशफाक शेख यांची भेट घेतली. त्यावेळी पीएसआय अशफाक शेख यांनी कहा है अकबर असे म्हणुन अकबर हे न आल्यामुळे अकबर याला नही आया तो गांड मे बांबु दाल दुंगा एक एक के.. चार्ज शिट थोडीच करः मैने, मेरा दिमाग खराब करे तो अशा धमक्या देऊन चलो आया मै आधे घंटे मे..असे म्हणुन मला थांबविले.

त्यानंतर मी व पंच सुरक्षित ठिकाणी परत गेलो. त्या ठिकाणी माझ्याकडील व्हाईस रेकॉर्डर काढुन त्यातील माझे व पीएसआय अशफाक शेख यांचेतील संभाषण क्षीरसागर साहेबांनी व दोन्ही पंचांनी ऐकले. त्यानंतर परत व्हाईस रेकॉर्डरमध्ये नवीन मेमरीकार्ड टाकुन पंच क्र.1 यांना माझ्यासोबत दिला व पावडर लावलेले पैसे माझ्याजवळ तसेच होते. व दुसऱ्यांदा पोलीस स्टेशन जिन्सी येथे पीएसआय अशफाक शेख यांना भेटण्यासाठी गेला. त्यावेळी अकबर यांचा मोबाईल नंबर माझ्याकडुन घेऊन फोन लावुन पाहिला अकबर यांचा मोबाईल बंद असल्याने पीएसआय अशफाक शेख चिडुन अकबर याला उसकी गांड फट रही होंगी तो फीर ये करेंगे.. बांधकामच करेंगे.. असे म्हणुन माझ्या फोनवरुन अलीमभाई यांना फोन करुन बोलले. त्यानंतर तक्रारदार यांनी पीएसआय अशफाक शेख यांना विचारले की, फिर बॉस हमारे लिए हुकूम त्यावेळी पीएसआय अशफाक शेख यांनी फोन का इन्तजार करोना.. फोन का इंतजार करोना.. आप हमारे दोस्त है..असे म्हणल्यामुळे मी व पंच क्र.1 असे पीएसआय अशफाक शेख यांचे कॅबीनचे बाहेर आलो व परत जाऊन मी पीएसआय अशफाक शेख यांची भेट घेतली अलीमभाई यांचे सत्तर हजार व निसार याचे तीस हजार असे एकुण 1 लाख रुपये सोबत आणल्याचे सांगितले........CCTNS प्रणालीमध्ये 8000 शब्दाची मर्यादा असल्याने फिर्यादीतील उर्वरीत मजकुर FIR सोबत जोडून सादर केला आहे...

13. **Action taken:: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):
Nirmala Mansing Pardeshi(I (Inspector)) / POBN74842 **or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**

**Rank (पद):** **No.(क्र.):**

**to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

Riteeh

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

डी.ओ. अधिकारी
पोलीस स्टेशन सिटी चौक
छत्रपती संभाजीनगर

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): Nirmala Mansing Pa

**Rank**(पद): I (Inspector)

**No.**(सं.): POBN74842